आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१२ ऑगस्ट २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ दुरुस्ती आणि केरळचं नाव केरळम करण्याच्या विधेयकाला संसदेची मंजुरी

- विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाई प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या निवेदन देणार

- माजी न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्यावरचे बेहिशेबी रोख रक्कम प्रकरणातले सगळे आरोप सिद्ध झाल्याचा संसदीय चौकशी समितीचा अहवाल

- शिवसेना विधीमंडळ पक्षाप्रमाणेच राजकीय पक्षात फूट पडली का हे तपासावे लागेल, असं सर्वोच्च न्यायालयाचं निरीक्षण

आणि

- टेबल टेनिस महासंघाची मान्यता केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून रद्द

**<><><><><>**

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ दुरुस्ती विधेयकाला राज्यसभेनं आज संमती दिली. केरळचं नाव बदलून ‘केरळम’ असं करायच्या विधेयकालाही राज्यसभेनं आज मंजुरी दिली. ही दोन्ही विधेयकं लोकसभेत काल मंजूर झाली होती. लोकसभेनं आज खाणी आणि खनिजं विकास आणि नियमन दुरुस्ती विधेयक २०२६ मंजूर केलं. तर परदेशी निधी नियमन विधेयक २०२६ संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थी आंदोलन, राम मंदिर देणगी अपहार आणि इतर मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजात आजही वारंवार व्यत्यय आला.

**<><><><><>**

नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाबाबत उद्या दुपारी ३ वाजता लोकसभेत निवेदन करू, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज सांगितलं. सरकारकडे लपवण्यासारखं काहीही नाही, आजपासूनच चर्चा सुरू करायची सरकारची तयारी आहे, असंही ते म्हणाले. यासंदर्भात अमित शहा यांनी सभापती ओम बिर्ला यांना पत्र लिहून

विद्यार्थी आंदोलनावर चर्चेबाबत विरोधकांशी संवाद साधायची विनंतीही केली आहे. यासंदर्भात संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू म्हणाले

**- - होल्ड - रिजीजू बाइट - - -**

दरम्यान, आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीमार करायचे, गोळ्या चालवायचे आदेश कुणी दिले, असा प्रश्न लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी पुन्हा उपस्थित केला.

**<><><><>**

माजी न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्यावरचे बेहिशेबी रोख रक्कम प्रकरणातले सगळे आरोप सिद्ध झाल्याचं संसदीय चौकशी समितीच्या अहवालात म्हटलं आहे. समितीचा हा अहवाल आज संसदेत सादर झाला. त्यांच्या शासकीय निवासस्थानाच्या साठवणीच्या खोलीमध्ये ही रोख रक्कम आढळून आली होती. या प्रकरणी पुरावे जपून ठेवण्यात आले नाहीत आणि नंतर या नोटा गहाळ झाल्या, असंही अहवालात नमूद केलं आहे. यावर वर्मा यांनी दिलेलं स्पष्टीकरण असमाधानकारक असल्याचंही समितीनं म्हटलं आहे.

**<><><><>**

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ चलनफुगवट्याचा दर जुलै महिन्यात वाढून साडेचार टक्के झाला. त्या आधीच्या म्हणजे जून महिन्यात हा दर ४ पूर्णांक ३८ शतांश टक्के होता. केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं आज ही आकडेवारी जाहीर केली. जुलैमधे ग्रामीण भागात चलनफुगवट्याचा दर ४ पूर्णांक ८४ शतांश टक्के राहिला तर शहरी भागात ३ पूर्णांक ९६ शतांश टक्के राहीला. अन्नपदार्थ, रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्स, व्यक्तिगत वापराच्या वस्तू इत्यादींचे दर वाढल्यामुळे ही वाढ झाली आहे. सोनं, चांदी, हिरे, प्लॅटिनमचे दागदागिने, आलं लसूण आणि कांदा यांचे दर वेगाने वाढले आहेत, तर मोटारी आणि जीप, बटाटे, भेंडी, वाटाणे आणि टोमॅटोच्या दरात फारशी वाढ झाली नाही असं निरीक्षण आहे.

**<><><><>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने आज इयत्ता बारावीच्या २०२६च्या पुरवणी परीक्षेचा निकाल आज जाहीर केला. विद्यार्थी results.digilocker.gov.in या संकेतस्थळावर आपला निकाल पाहू शकतात.

**<><><><>**

शिवसेना विधिमंडळ पक्षात पडलेली फूट ही पक्षसंघटनेपर्यंत आणि प्राथमिक सदस्यत्वापर्यंत पोहोचते का, हे आधी तपासावं लागेल, असं मत सर्वोच्च न्यायालयानं आज नोंदवलं. एकनाथ शिंदे गटाला खरी शिवसेना मानून पक्षाचं धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. विधिमंडळ पक्षात फूट पडली, याचा अर्थ राजकीय पक्षात फूट पडली, असा होत नाही, असा युक्तिवाद शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वकील कपिल सिबल यांनी केला. पक्षात फूट पडली आहे का, हे आधी तपासायला हवं. फुटीची सुरुवात विधिमंडळ पक्षापासून होऊ शकते, आणि ही फूट वाढत जाऊन पुढे पक्ष संघटना आणि प्राथमिक सदस्यत्वापर्यंत पोहोचू शकते, असं मत न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी नोंदवलं. या प्रकरणाची पुढची सुनावणी उद्या होणार आहे.

<><><><>

देशात कोठेही अनधिकृत बांधकामं नियमित करण्याबाबत किंवा पाडण्याबाबत एकसमान धोरण तयार करण्याचा विचार करावा असं सर्वोच्च न्यायालयानं सर्व राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. अनधिकृत बांधकामासंदर्भात ठिकठिकाणची परिस्थिती वेगवेगळी असल्यानं एकच मापदंड सर्वत्र लावता येणार नाही हे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठानं मान्य केलं, मात्र सध्याच्या चौकटीत याविषयी समान धोरण तयार करता येईल का याचा विचार करावा असं त्यांनी सांगितलं. अनेकदा अनधिकृत बांधकाम नियमित होईल असं आश्वासन प्रशासनातर्फे रहिवाशांना दिलं जातं, त्यामुळे ते पाडलं जात नाही असं याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितलं.

<><><><>

सार्वजनिक भांडवल हे खासगी गुंतवणुकीला पर्याय न ठरता त्या गुंतवणुकीसाठी एक उत्प्रेरक ठरायला हवं, असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं. ब्रिक्स सदस्य देशांमध्ये खासगी भांडवल उभारणीत 'न्यू डेव्हलपमेंट बँक'च्या भूमिकेबाबत जयपूर इथे आयोजित एका परिसंवादाला त्या संबोधित करत होत्या. ब्रिक्स देशांच्या अर्थव्यवस्था जागतिक विकासाची प्रमुख इंजिनं आहेत. मात्र, भांडवलाची उपलब्धता सुनिश्चित

करण्याबरोबरच गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करणे, स्थिरता राखणे आणि दीर्घकालीन धोरणात्मक आराखडा प्रदान करणं तितकंच महत्त्वाचे आहे, असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

निवडणूक आयोगानं नेमलेलं BLO अर्थात बूथ लेव्हल ऑफिसर आणि राजकीय पक्षांनी नेमलेल्या प्रतिनिधींना SIR चे काम एकत्र करता येईल. पण कामात कुठेही चूक झाल्याचं आढळलं दोषींवर कारवाई करण्याचा इशारा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिला आहे. मंत्रालयात आयोजित वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. राजकीय पक्षांशी असलेले सर्व संबंध चुकीचेच असतात, असे गृहीत धरू नका. सर्व राजकीय पक्षांनी हे प्रतिनिधी नेमले आहेत, असं ते म्हणाले.

मतदाराने गणना प्रपत्र स्विकारण्यास नकार दिला किंवा गणना प्रपत्रावर स्वाक्षरी केली नाही तर मतदार यादीत त्यांचं नाव येणार नाही, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मुंबईत कुर्ला पश्चिम इथं आज पहाटेच्या सुमारास २ ते ३ घरांवर दरड कोसळल्यामुळे सात जणांचा मृत्यू झाला तर ७ जण जखमी झाले आहेत. जखमींवर रूग्णालयात उपचार सुरू आहे.

मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. दुर्घटनेत मरण पावलेल्या प्रत्येकाच्या कुटुंबाला ४ लाख रुपयांची तर जखमी झालेल्या प्रत्येकाला ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

<><><><><>

भारतीय भौतिकशास्त्रज्ञ दीपक धर यांना statistical mechanics क्षेत्रातल्या योगदानासाठी २०२६ चं प्रतिष्ठित डिरॅक पदक जाहीर झालं आहे. भौतिकशास्त्र क्षेत्रातल्या प्रतिष्ठित सन्मानांपैकी एक असा हा सन्मान आहे. इंटरनॅशनल सेंटर फॉर थिअरॉटिकल फिजिक्सकडून हा पुरस्कार दिला जातो. धर यांच्याशिवाय यंदा फ्रान्सच्या बर्नार्ड डेरिडा, इटलीचे मार्क मेझार्ड आणि इस्राइलचे हैम सोमपोलिन्स्की यांनाही हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

<><><><><>

चीनचे माजी अध्यक्ष झू रोंगजी यांचं आज बिजींगमधे निधन झालं. ते ९८ वर्षांचे होते. १९९८ ते २००३ या काळात त्यांनी चीनचं अध्यक्षपद भूषवलं. सुधारणावादी दृष्टिकोन स्वीकारुन ९०च्या दशकात  चीनच्या अर्थव्यवस्थेला उर्जितावस्था प्राप्त करुन देण्यात त्यांचं मोठं योगदान होतं.

<><><><><>

आवश्यक शर्तींची पूर्तता न केल्यामुळे केंद्रीय क्रीडा मंत्रालयानं, टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडियाची मान्यता आज स्थगित केली.  यापूर्वी महासंघाला पाठवलेल्या कारणे दाखवा नोटीसला फेडरेशनने असमाधानकारक उत्तरे दिल्यामुळे, वेळेवर निवडणुका न घेतल्याने ही निलंबनाची कारवाई झाल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.  या महासंघाच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्याची सूचना मंत्रालयानं भारतीय ऑलिम्पिक संघटनेला केली आहे.

<><><><><>

नायजेरियात लागोस इथं सुरू असलेल्या 'कॉमनवेल्थ चॅम्पियनशिप' स्पर्धेत तिसऱ्या दिवशी, भारतीय तलवारबाजांनी वैयक्तिक प्रकारांमध्ये तीन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य, अशी पाच पदकं पटकावली. त्यामुळे भारताची एकूण पदकसंख्या २९ वर पोहोचली आहे. यात ८ सुवर्ण, ७ रौप्य आणि १४ कांस्य पदकांचा समावेश आहे.

//<><><><><>//